# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## दि. 31/01/2020

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्ह्यात दि 30/01/2020 रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या (06) वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन 1200/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री करणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक 30/01/2020 रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत एकुण 05 ठिकाणी कार्यवाही करून आरोपीकडुन एकूण 2196 लिटर दारू असा एकूण किं. अं. 8870 /— रूपयाचा अवैध दारूचा साठा जप्त करण्यात आला असुन आरोपीविरूध्द दारूबंदी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत वाहन ठेवणाऱ्या विरूध्द अपराध दाखल:—**

दिनांक 30/01/2020 रोजी हिंगोली जिल्हा अंतर्गत कलम 283 भादंवि प्रमाणे 01 गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील आरोपीने आपले ताब्यातील टाटा मॅजीक हा रोडचे मध्यभागी उभा करून येणारे जाणाऱ्यास धोका अटकाव निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आला या संदर्भात हिंगोली जिल्हा पोलीस तपास करीत आहेत.

**दुखापत :—** दिनांक 30/01/2020 रोजी प्रकाश निवृत्ती सोनवणे वय 45 व्य शेतमजुरी जात बौध्द रा करंजाळा ता वसमत यांचे फिर्यादीवरून पोस्टे हट्टा येथे कलम 324,323,504,506,34 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 29/01/2020 रोजी 21.00 वा चे सु मौजे करंजाळा फिर्यादीचे घरासमोर यातील आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस विळ्याने पाठीवर दंडावर मारून जखमी केले व आईस कत्तीने मारून मुक्कामार दिला व शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल असुन या संदर्भात हट्टा पोलीस तपास करीत आहेत.

**मरणास कारणीभुत ठरणा—या विरूध्द अपराध दाखल :—** दिनांक 30/01/2020 रोजी फिर्यादी त्र्यंबक रमेश सुर्यवंशी वय 24 व्य शेती रा दाती ता कळमनुरी यांचे फिर्यादीवरून पोस्टे बाळापुर येथे कलम 304 अ, 279 भादंवि व 134/187 मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल असुन दिनांक 28/01/2020 चे 17.30 वा चे सुमारास मौजे दाती शिवारात हिंगोली ते नांदेड जानारे रोडचे बाजुला दाती पाटीजवळ दक्षिणेस 05 किमी यातील होन्डा ड्रिमयुगा कंपनीची मोसा क्र एम एच 38 वाय 1667 चा चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाववेगात हयगईने व निष्काळजीपणाने चालवुन नमुद मयत रमेश योगाजी सुर्यवंशी वय 45 रा दाती यांना जोराची धडक देवुन ते खाली जमिनीवर पडल्याने त्यांचे डोक्यास पाठीमागुन जबर मार लागुन उपचार दरम्यान मरण पावले व नमुद मोसा मयतास धडक देवुन मदत न करता निघुन गेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बाळापुर पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधीक्षक हिंगोली
करिता.